MAHARASHTRA ANIMAL & FISHERY SCIENCES UNIVERSITY NAGPUR



# माफसू यशोगाथा २०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव









## पदवीधर किरणकुमार यांनी नोकरीच्या मागे न धावता मत्स्य व्यवसायातुन साधली प्रगती

श्री. किरण कुमार जागेश्वर मेश्राम हे मु. पो. तालुका अर्जुनीमोर, जि. गोंदिया येथील रहिवासी आहेत. श्री. किरण कुमार हे पदवीधर असुन देखील नोकरीच्या मागे न धावता मत्स्य क्षेत्राची आवड असल्यामुळे त्यांनी मत्स्य व्यवसाय करण्याचे ठरविले होते व तशी त्यांची जिद्द होती. त्यासाठी त्यांनी मत्स्यशास्त्रासंबंधी माहिती घेवून शास्त्रशुध्द पध्दतीने मत्स्यव्यवसाय करायचे ठरविले होते. मत्स्य संवर्धन करण्यासाठी त्यांनी संबंधीत माहिती मिळण्याकरीता महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे संपर्क साधला तसेच मत्स्य संवर्धन करण्यासाठी महाविद्यालयातुन प्रशिक्षण देखील पुर्ण केले. प्रशिक्षणादरम्यान त्यांनी मत्स्य संवर्धनात अधिक उत्पादन देणाऱ्या माशांच्या प्रजातींचे संवर्धन कसे करावे, नेटींग, एरीयेशन, पाणी गुणवत्ता तपासणे, नर्सरी तलावाचे व्यवस्थापन, तलावातील खाद्य व्यवस्थापन, तलावातील अपायकारक माशांचा नायनाट इत्यादी बाबीविषयी तंत्रज्ञान आत्मसात केले. मत्स्य संवर्धनासाठी लागणारी महत्वाची माहिती प्रशिक्षणातून मिळवून तसेच मेहनतीला शास्त्रशुध्द ज्ञानाची सांगड घालत त्यांनी सुरूवातीला स्वत:कडे छोटेखानी उपलब्ध असलेल्या जमिनिचा व नंतर तलाव भाडेतत्वावर घेवून मत्स्य संवर्धनास सुरूवात केली.

मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील सहाय्यक प्राध्यापक श्री.उमेश सुर्यवंशी यांनी श्री. किरण कुमार यांना मत्स्य संवर्धन करतांना येणाऱ्या अडचणींचे निरसण केले व शास्त्रशुध्द पध्दतीने मत्स्य व्यवसाय कसा करावा याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले. मत्स्य पालना विषयी उचित अशी शास्त्रशुध्द माहिती प्राप्त झाल्यावर श्री. किरण कुमार यांनी मत्स्य संवर्धनातून जास्तीतजास्त उत्पादन कसे मिळविता येईल यासाठी विशेष प्रयत्न केले. मत्स्य संवर्धनात एक वर्षाच्या कालावधीनंतर त्यांनी १५ टन माशांची विक्री केली. त्यामधुन त्यांना संपुर्ण खर्च वजा जाता निव्वळ ५ ते ६ लाखांचा नफा झाला .

मत्स्य संवर्धन करतांना श्री. किरण कुमार यांना कोव्हीड २०१९ चा काळ असल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. तसेच लॉकडाऊन काळात मासे विक्रीसाठी बाजारपेठे उपलब्ध न झाल्याने स्वत: किरकोळ मासे विक्रीतून देखील नफा कमविला व मत्स्य संवर्धन सुरूच ठेवले. येणाऱ्या काळातही ते आधुनिक मत्स्य संवर्धन करणार असा निर्धार त्यांनी केला आहे. तसेच मत्स्य व्यवसायात ते आनंदी असून समाधानी आहेत.

मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील तज्ञ श्री. उमेश सुर्यवंशी व इतर प्राध्यापक वर्ग श्री किरण कुमार यांना आधुनिक मत्स्य संवर्धनाकरीता वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करीत असतात.

मार्गदर्शक
**श्री उमेश सुर्यवंशी व डॉ. प्रशांत तेलवेकर**
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर

**श्री किरणकुमार जागेश्वर मेश्राम**
अर्जुनीमोर, जि. गोंदिया
मो. ८३९०९९४८९८